# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 30.04.2024** **वार: मंगळवार**

---

**बॅलेटयुनिट**

लोकसभा निवडणुकीत बारामतीमध्ये-38, पुणे मतदारसंघात-35, शिरुरमधून 32 आणि मावळमधून 33 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे आता मतदानासाठी ईव्हीएमला तीन बॅलेट युनिट वापरावे लागणार आहेत. जिल्ह्यात सुमारे 8 हजार 213 मतदान केंद्र असून या सर्व मतदान केंद्रांवर मिळून 24 हजार 639 बॅलेट युनिट असतील. ईव्हीएमवरील बॅलेट युनिटवर 16 उमेदवारांसाठी बटणांची मर्यादा आहे. एक बटण हे "नोटा' मतासाठी असते. त्यामुळे जर 15 उमेदवार रिंगणात असतील, तर एकच बॅलेट युनिट वापरावं लागतं. मात्र जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघांत उमेदवारांची संख्या जास्त असल्याने तीन बॅलेट युनिट मतदान यंत्राच्या टेबलवर असतील.

**मतदान**

येत्या १३ मे रोजी पुण्यात होत असलेल्या लोकसभा निवडणुकीत मतदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ५० रुपयांचं पेट्रोल मोफत देण्याचा निर्णय पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनने घेतला आहे. गेल्या निवडणुकीत पुण्यात सर्वात कमी मतदानाची नोंद झाली होती. यंदा त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी स्थानिक प्रशासन मोठ्या प्रमाणावर मतदार जनजागृती करत आहे; तसंच विविध व्यावसायिक संघटनांनीही आता त्यासाठी पुढाकार घेतला आहे.

**सिंधी मतदार**

गेल्या १५-२० वर्षांपूर्वी पाकिस्तानातून भारतात आलेल्या पिंपरीमधील सिंधी नागरिकांना यंदाच्या लोकसभा निवडणुकीत प्रथमच मतदान करण्याची संधी मिळणार आहे. पिंपरीतील सुमारे १५० सिंधी नागरिकांना २०२० आणि २०२१मध्ये भारताचं नागरिकत्व बहाल करण्यात आलं असून त्यानंतर त्यांनी आपलं नाव स्थानिक मतदार यादीत नोंदवलं आहे. त्यानंतर आता होत असलेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत या मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

**प्रचार-प्रेसनोट**

लोकसभा निवडणुकीसाठीचा प्रचार आता शिगेला पोहोचला असून सर्वच पक्षांचे उमेदवार आणि नेते रोड शो, सभा, पदयात्रा या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. पुण्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी आज कसबा मतदार संघात पदयात्रा केली. गेल्या १० वर्षात पुण्याच्या विकासाला खीळ बसली आहे, असा आरोप धंगेकर यांनी यावेळी केला. दरम्यान महाविकास आघाडीची आज पुण्यात जाहीर सभा होत आहे. या सभेला शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात संबोधित करतील.

पुण्यातले भाजपा उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी पुणे शहर भाजप व्यापारी आघाडीच्या वतीनं मेळावा आयोजित करण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांच्या यादीत भारताने दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर झेप घेतली असून, 2027 पर्यंत भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केला.

**ऑनलाइन नोंदणी**
नाफेडच्या वतीने तूर आणि हरभरा खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. खरेदीचा कालावधी २५ जूनपर्यंत असेल. बारामतीमध्ये शासनाचं हमीभाव खरेदी केंद्र मंजूर झालं असून शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत नाव नोंदणी करावी असं आवाहन बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार यांनी केलं आहे. ऑनलाइन नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची तूर प्रति क्विंटल सात हजार आणि हरभरा प्रति क्विंटल ५ हजार ४४० रुपये दराने खरेदी केला जाणार आहे.

**pcmc**
पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छाग्रह मोहिमेच्या माध्यमातून शून्य कचरा झोपडपट्टी उपक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत गवळीमाथा झोपडपट्टीमध्ये शून्य कचरा मोहीम राबवण्यात येणार आहे. या झोपडपट्टीमधून दररोज 637 किलो कचरा गुलाब पुष्प उद्यानात आणून त्यातून खतनिर्मिती करण्याचं महापालिकेचं नियोजन आहे.

**अपहरण**
पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातून दोन दिवसांपूर्वी सात महिन्यांच्या बालकाचं अपहरण झालं होतं; या प्रकरणी एकाला बंडगार्डन पोलिसांनी अटक केली आहे. या व्यक्तीला पोलिसांनी कर्नाटकातील विजापूर परिसरातून अटक केली.

क्रीडा
पुण्यात नुकत्याच झालेल्या १७व्या वरीष्ठ गट राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेत पुरुष गटात पुणे जिल्हा संघाने अजिंक्यपद पटकावलं. अंतिम सामन्यात पुणे जिल्हा संघाने भंडारा जिल्हा संघावर २५ -१५ अशा गुण फरकाने विजय मिळवला. तर महिला गटात भंडारा जिल्हा संघ विजेता ठरला. विविध जिल्ह्यांतील २५ पुरुष संघ आणि २० महिला संघानी यात सहभाग घेतला.

**हवामान**
पुणे आणि परिसरात उन्हाची काहिली वाढतच आहे; आज कमाल ४१ अंश तापमानाची नोंद झाली. पुढचे काही दिवस कमाल तापमान ४०च्या पुढेच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**